# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.१ जून २०२६ | 9422660077 | आरएनआय–एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 1 June 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 266 | Pages 4 | Rate 4 Rs



## काँग्रेसने तरी ओबीसींचे काय कल्याण केले?

**मुंबई**–मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे शेतात शनिवारी सकाळी भर उन्हात सुरू केलेले बेमुदत उपोषण १५ तासांनंतर सोडले. त्यानंतर सरकारच्या एकंदरीत भूमिकेवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी डबल ढोलकी सरकार म्हणत सडकून टीका केली आहे. तसेच लक्ष्मण हाके यांनी देखील तत्परता नव्हे तर सरकारची लाचारी म्हणत टीका केली होती. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे सध्या गॅलक्सि रुग्णालायत दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. यावेळी भाजप नेते प्रसाद लाड यांनी त्यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली आहे.मनोज जरांगे पाटील म्हणाले, विजय वडेट्टीवार यांचे काँग्रेसचे सरकार असताना ओबीसींचे कल्याण केले होते का? झोके बांधून दिले होते का? काही बोलतात. ते काय धडाचे होते का? हे पण काही धडाचे नाहीत, यांनी पण मराठा आणि ओबीसी समाजासाठी काही नाही केले.

# विराटची दमदार खेळी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरून सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन

### विराटचा विराट शो

**मोठ्या सामन्यात पुन्हा एकदा विराट कोहलीने आपला अनुभव दाखवून दिला. त्याने अवघ्या ४२ चेंडूत ७५ धावांची तुफानी खेळी करत बंगळुरूच्या विजयाचा पाया रचला. त्याच्या खेळीत ९ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. विशेष म्हणजे, हे त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. तोच आयपीएल २०२६ च्या फायनलचा सामनावीर झाला.**







दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (RCB) आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सचा ५ विकेट्सने पराभव करत सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपदावर आपले नाव कोरले. नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या लढतीत विराट कोहलीच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर बंगळुरूने १५६ धावांचे लक्ष्य १८ षटकांत ५ गडी गमावून पूर्ण केले आणि आयपीएलची ट्रॉफी आपल्या नावावर केली.

विराट कोहली आणि वेंकटेश अय्यर यांनी ठउइ ला आक्रमक सुरुवात करून दिली. अय्यरने १६ चेंडूत ३२ धावांची खेळी करत गुजरातच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. राशिद खानने एका षटकात दोन विकेट्स घेत सामना रंगतदार केला, मात्र विराटने डाव सांभाळत विजय जवळ आणत १८ व्या षटकांत विजय मिळवला.याआधी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतलेल्या ठउइ ने गुजरातला २० षटकांत आठ बाद १५५ वर रोखले. गुजरातकडून वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ५० धावा केल्या, तर इतर फलंदाज अपयशी ठरले. बंगळुरूकडून रसिख सलामने ३ विकेट्स घेत सर्वाधिक प्रभाव टाकला. जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी २ बळी घेत गुजरातला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखले.

# केज तहसीलदारांची धडक कारवाई; एका दिवसात पाच शिव रस्त्यांचे अतिक्रमण काढले

**आमच्या प्रतिनिधीने कोठी येथील सरपंच बप्पा डोंगरे यांना संपर्क साधला असता शिव रस्त्याचा प्रश्न सोडविला याबद्दल प्रशिक्षणार्थी तहसीलदार शुभम पवार यांच्या भव्य सत्काराचे आयोजन करत आहे असे बप्पा डोंगरे सरपंच, कोठी यांनी सांगितले आहे.**



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.२९ मे शुक्रवार रोजी केज तालुक्यातील लव्हुरी – कोठी या गावचे जुने अनेक वर्षापासून अतिक्रमण करून शिव रस्ते बंद केलेले होते. दोन्ही गावच्या शेतकऱ्यांनी अनेक वेळा रस्ता खुला करण्याची मागणी नियमा प्रमाणे तहसील कार्यालय,केज यांच्याकडे अनेक वर्षा पासुन होत असल्याने

केजचे प्रशिक्षणार्थी तहसीलदार शुभम पवार यांनी आपल्या कर्मचारी फौजफाट्यासह मस्साजोग च्या मंडळ अधिकारी वैशाली देशमुख,ग्राम महसुल अधिकारी सज्जा लव्हुरी चे ग्राममहसुल अधिकारी अशोक चटप,भूमि अभिलेख कार्यालय केज चे सुदाम चौरे आणि केज पोलीसांच्या बंदोबस्तात.शुक्रवार दि.२९ मे २०२६ रोजी लव्हुरी–कोठी येथील शिव रस्ता अतिक्रमण खुले केले तसेच लव्हुरी येथील गट नं.११० व १११ मधील पाच सर्वे नं. मधील अतिक्रमण मोकळे केले एकाच दिवसात पाच रस्ते मोकळे केल्याने शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सुटल्याने प्रशिक्षणार्थी तहसीलदार शुभम पवार यांचे शिस्तप्रिय व धाडसी अधिकारी म्हणुन सर्वत्र चर्चा होऊन सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.



**लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर, तेलगाव कार्यालयात आज पुण्यश्लोक लोककल्याणकारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करनेत आली. प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, अशोक पाटिल, राजेश देशमुख, माणिक सोळंके, नागोराव निर्मळ, महादेव मुरकुटे, दिगंबर विर, गोरख वाशिंबे, धनंजय सोळंके, अभिजित मोरे**






# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.३१ मे २०२६ रविवार रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता. केज या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले व अभिवादन करून त्यांची जयंती साजरी करण्यात आली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात चौंडी येथे झाला.आईचे नाव सुशिलाबाई व वडील माणकोजी शिंदे हे असुन पतीचे नाव खंडेराव असुन त्या माळव्यात तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात.त्या स्वतःसैन्याचे नेतृत्व करत होत्या तसेच त्या उचित न्यायदान करत असत.अशा या शुर वीर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याबद्दल माहिती आपल्या प्रास्ताविकात या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितली. यावेळी श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज,डॉ.श्री. रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती



अनिलकुमार भोरे मॅडम,श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे सर,श्री.राहुल बजरंग बचुटे सर व विद्यार्थी उपस्थित होते.

# संपादकीय

## सोने खरेदी नंतर; देश प्रथम

भारतीयांना सोन्याचे आकर्षण पूर्वीपासूनच आहे. पण मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सोन्याच्या खरेदीमुळे देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. त्यामुळे आता 'आधी देश, नंतर सोने' हा विचार स्वीकारून जबाबदारीने गुंतवणूक करण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतीय समाज आणि सोने हे एक आगळेवेगळे नाते आहे. अन्न, वस्त्र, निवारा इतकीच आम्हा भारतीयांसाठी सोनेदेखील जीवानवश्यक गरज आहे, असे अतिशयोक्तीने म्हटले जाते. सोने स्वस्त असो व महाग असो, सोने खरेदीचा ओघ फार पूर्वीपासून आपल्या देशामध्ये चालत आलेला आहे. महिलांच्या जोडीला पुरुषही ब्रेसलेट, चैन, अंगठी, हातातले कडे, कानातल्या बाळ्या यासाठी सातत्याने सोने खरेदी करत असतात. सध्या अमेरिका, इराण, इस्त्रायल असे युद्ध सुरु आहे. इंधनाच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. इंधन खरेदीसाठी परकीय चलन गरजेचे आहे. सोन्यामध्ये होत असलेली गुंततवणूक पाहता अमेरिकेकडे जात असलेले डॉलरच्या माध्यमातून परकीय चलन पाहता पंतप्रधान मोदी यांनी भारतीयांना किमान वर्षभर सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले. ही मात्रा लागू पडली. सोने खरेदी ओघ आटला. सोने खरेदीनंतर, देश प्रथम हा ट्रेंड वेगाने विकसित होत आहे. परकीय चलन देशाबाहेर जाण्याचे ध्येय बऱ्याच अंशी साध्य झाले. भारतीय समाजात सोन्याला केवळ मौल्यवान धातू म्हणून पाहिले जात नाही, तर तो प्रतिष्ठा, सुरक्षितता, संस्कृती आणि भावनिक गुंतवणुकीचे प्रतीक मानला जातो. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक परंपरा किंवा बचतीचा पर्याय म्हणून भारतात सोन्याला विशेष महत्त्व आहे. 'सोने म्हणजे सुरक्षित भविष्य' अशी मानसिकता अनेक वर्षांपासून भारतीय समाजात रुजलेली आहे. त्यामुळे देशात सोन्याची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र या वाढत्या सोन्याच्या आयातीचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता आता केंद्र सरकारकडून व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काही काळ सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केल्याची चर्चा आर्थिक आणि सामाजिक स्तरावर सुरू झाली आहे. या आवाहनामागे देशाची आर्थिक स्थिती, परकीय चलनाचा तुटवडा आणि डॉलरचा वाढता दबाव ही महत्त्वाची कारणे आहेत.भारत हा जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या ग्राहक देशांपैकी एक मानला जातो. देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर सोने आयात केले जाते. भारतात उत्पादित होणारे सोने अत्यल्प असल्याने बहुतांश सोने परदेशातून, विशेषतः अमेरिका आणि इतर देशांतून आयात करावे लागते. या आयातीसाठी डॉलरमध्ये पैसे द्यावे लागतात. परिणामी देशातील परकीय चलनाचा मोठा साठा सोन्याच्या खरेदीसाठी खर्च होतो. याचा थेट परिणाम भारताच्या चालू खात्यातील तुटीवर आणि रुपयाच्या मूल्यावर होतो. भारतीयांना सोन्याचे आकर्षण का आहे, याची अनेक सामाजिक आणि मानसिक कारणे आहेत. ग्रामीण भागात आजही सोने हीच सर्वात सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. शेअर बाजार, म्युच्युअल फंड किंवा डिजिटल गुंतवणूक याबाबत अजूनही अनेकांना पुरेशी माहिती नाही. त्यामुळे हातात दिसणारी आणि गरजेच्या वेळी विकता येणारी मालमत्ता म्हणून सोन्याकडे पाहिले जाते. महिलांसाठी दागिने हे केवळ अलंकार नसून त्यात भावनिक आणि कौटुंबिक सुरक्षिततेची भावना जोडलेली असते. लग्नात मुलीला सोने देणे ही सामाजिक प्रतिष्ठेची बाब मानली जाते. अनेक कुटुंबे कर्ज काढूनसुद्धा सोन्याची खरेदी करतात. यामुळे 'सोन्याचे वेड' ही मानसिकता समाजात अधिक दृढ होत चालली आहे. अलीकडच्या काळात सोन्याचे दर सातत्याने वाढत असूनही खरेदीत घट झालेली दिसत नाही. उलट सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे अनेकांना ते अधिक सुरक्षित गुंतवणूक वाटू लागले आहे. आर्थिक अस्थिरता, महागाई आणि जागतिक तणावाच्या काळात लोक सोने खरेदीकडे वळतात. त्यामुळे मागणी वाढतच राहते. पण देशाच्या दृष्टीने ही स्थिती चिंताजनक आहे. कारण उत्पादनक्षम क्षेत्रात गुंतवणूक होण्याऐवजी मोठ्या प्रमाणात पैसा निष्क्रिय स्वरूपात सोन्यात अडकून राहतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते. देशातील नागरिकांनी काही काळ अनावश्यक सोन्याची खरेदी टाळली, तर देशाचा मोठा परकीय चलन खर्च वाचू शकतो. भारताला कच्चे तेल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आणि औद्योगिक उत्पादनासाठीही मोठ्या प्रमाणावर डॉलरची आवश्यकता असते. अशा वेळी सोन्यासारख्या अनुत्पादक आयातीवर होणारा खर्च कमी झाला, तर देशाचा आर्थिक समतोल सुधारण्यास मदत होऊ शकते. सोने आयात कमी झाल्यास भारताच्या परकीय चलन साठ्यावरचा दबाव कमी होईल. डॉलरची मागणी घटल्याने रुपयाचे मूल्य स्थिर राहण्यास मदत मिळू शकते. रुपया मजबूत राहिला, तर आयात खर्च कमी होतो आणि महागाई नियंत्रणात ठेवणे सरकारसाठी तुलनेने सोपे जाते. तसेच चालू खात्यातील तूट कमी झाल्यास देशाच्या आर्थिक स्थैर्याला बळ मिळते. परकीय गुंतवणूकदारांचाही भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास वाढतो.जर नागरिकांनी सोन्याऐवजी बँक ठेवी, शेअर बाजार, म्युच्युअल फंड, सरकारी रोखे किंवा उद्योगांमध्ये गुंतवणूक केली, तर त्या पैशाचा उपयोग देशातील उत्पादन, रोजगार आणि उद्योगवाढीसाठी होऊ शकतो. अर्थव्यवस्थेत पैसा फिरत राहिल्यास विकासाला गती मिळते; परंतु मोठ्या प्रमाणावर पैसा सोन्याच्या स्वरूपात घरात किंवा लॉकरमध्ये पडून राहिला, तर त्यातून देशाच्या उत्पादन क्षमतेत कोणतीही भर पडत नाही. त्यामुळे 'मृत गुंतवणूक' अशी टीका अनेक अर्थतज्ज्ञ सोन्यावर करतात. सरकारने यापूर्वीही गोल्ड बाँड योजना, गोल्ड मॉनेटायझेशन योजना यांसारख्या पर्यायांद्वारे नागरिकांना प्रत्यक्ष सोने खरेदी टाळण्याचे प्रयत्न केले होते. मात्र भारतीय समाजातील मानसिकता बदलणे हे मोठे आव्हान आहे. लोकांना सोन्यातील भावनिक सुरक्षितता अधिक महत्त्वाची वाटते. त्यामुळे केवळ सरकारी योजना जाहीर करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी आर्थिक साक्षरता वाढवणे, गुंतवणुकीचे पर्याय समजावून सांगणे आणि समाजात नवीन आर्थिक विचार निर्माण करणे गरजेचे आहे.माध्यमे, बँका, शैक्षणिक संस्था आणि आर्थिक तज्ज्ञ यांनीही यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. 'जास्त सोने म्हणजे जास्त सुरक्षितता' हा समज बदलून 'उत्पादनक्षम गुंतवणूक म्हणजे आर्थिक प्रगती' ही भावना समाजात रुजवावी लागेल. विशेषतः तरुण पिढीला आधुनिक आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा नाही की, सोने पूर्णपणे वाईट आहे किंवा त्याची खरेदी थांबवावीच लागेल. भारतीय संस्कृतीत सोन्याचे स्थान कायम राहणार आहे. मात्र अतिरेक टाळणे आणि गरज व गुंतवणूक यामध्ये संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. प्रतिष्ठा दाखवण्यासाठी किंवा सामाजिक दबावामुळे होणारी अनावश्यक सोन्याची खरेदी कमी झाली, तर त्याचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होऊ शकतो. आज भारत जगातील मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी प्रत्येक नागरिकाची आर्थिक सवय देशाच्या प्रगतीशी जोडली जाते. जर नागरिकांनी विवेकाने खर्च आणि गुंतवणूक केली, तर देशाचा आर्थिक पाया अधिक मजबूत होईल. पंतप्रधानांनी केलेले आवाहन हे केवळ सोन्याबाबत नसून देशहितासाठी जबाबदार आर्थिक वर्तन करण्याचा संदेश आहे.देशाच्या विकासासाठी सरकारच्या धोरणांसोबतच नागरिकांची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. सोन्याविषयीचे आकर्षण कायम राहू शकते, पण त्याचे अतिरेकी वेड देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी घातक ठरू शकते. त्यामुळे 'देश प्रथम' ही भावना ठेवून नागरिकांनी विचारपूर्वक निर्णय घेणे, हीच आजची खरी गरज आहे.

# देगलूरच्या सीमावर्ती भागात 'एअरटेल'ची सेवा आयसीयूमध्ये ५ जी रिचार्ज करूनही ग्राहक वाऱ्यावर

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देशभरामध्ये 'डिजिटल इंडिया' आणि हाय-स्पीड ५जी इंटरनेटचा मोठा गाजावाजा केला जात असताना, प्रत्यक्ष ग्रामीण आणि सीमावर्ती भागात मात्र ग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. देगलूर तालुक्यातील ऐतिहासिक आणि सीमावर्ती भाग असलेल्या शेळगाव (नृसिंह) परिसरामध्ये 'एअरटेल' टेलिकॉम कंपनीच्या विस्कळीत आणि निकृष्ट दर्जाच्या सेवेमुळे हजारो ग्राहक त्रस्त झाले आहेत. ५जी चे महागडे प्लॅन्स रिचार्ज करूनही ग्राहकांना हक्काची सेवा मिळत नसल्याने, कंपनी ग्राहकांची उघड फसवणूक करत असल्याचा आरोप आता येथील नागरिक करत आहेत.

**महागडे रिचार्ज, पण सेवा शून्य..?**

शेळगाव नृसिंह या मुख्य गावांसह परिसरातील शेखापूर, शेवाळा, तमलूर, उमर सांगवी आणि शहापूर सर्कल येथील हजारो शेतकरी, व्यापारी, नोकरदार आणि विद्यार्थ्यांनी दरमहा शेकडो रुपये खर्चून '५जी अनलिमिटेड'चे प्लॅन्स रिचार्ज केले आहेत. मात्र, या परिसरात पाऊल ठेवताच मोबाईल स्क्रीनवरील ५जी नेटवर्क गायब होते. त्याऐवजी अत्यंत क्षीण आणि संथ गतीचे ४ जी नेटवर्क दिसते. हे ४ जी नेटवर्कही दिवसातून शेकडो वेळा पूर्णपणे बंद पडत असल्याने नागरिकांचा बाहेरील जगाशी संपर्क तुटत आहे.कॉल सुरू असतानाच अचानक आवाज कट होणे (कॉल ड्रॉप), इंटरनेट न चालणे यामुळे व्यापारी आणि नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. बँकेचे ऑनलाईन व्यवहार, विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण आणि शासकीय कामे एअरटेलच्या या ढिसाळ कारभारामुळे ठप्प झाली आहेत.

कायदेशीर तरतुदींनुसार, ग्राहकांकडून ठरलेली पूर्ण रक्कम आगाऊ घेऊनही त्यांना निकृष्ट दर्जाची सेवा देणे किंवा सेवा न देणे, हा 'ग्राहक हक्क संरक्षण कायदा २०१९' च्या कलम २(११) अंतर्गत सेवेतील त्रुटी आणि कलम २(४७) नुसार अनुचित व्यापारी प्रथेचा गंभीर गुन्हा ठरतो. एअरटेल कंपनी ग्राहकांच्या कायदेशीर हक्कांचे उघड उल्लंघन करत असल्याचा सूर कायदेतज्ज्ञांमधून उमटत आहे.

या व्यावसायिक फसवणुकीविरोधात शेळगाव नृसिंह येथील गावकऱ्यांनी आणि सजग नागरिकांनी एकत्र येत एअरटेल कंपनीचा जाहीर निषेध केला आहे. कंपनीने तातडीने या भागात नवीन मोबाईल टॉवर उभारून ५जी सेवा सुरळीत करावी, अन्यथा कंपनीविरुद्ध ग्राहक न्यायालयात सामूहिक दाद मागण्याचा आणि तीव्र आंदोलन करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिली आहे.



# बीड शहरात खळबळ जीवे मारण्याचा प्रयत्न?

## धनंजय देशमुख यांच्या वर गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात एक मोठी आणि खळबळजनक घटना समोर आली असून दिवंगत मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्याविरोधात जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणा मुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार,तक्रारदार समाधान खिंडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्या प्रमाणे,बीड बायपास परिसरातील हॉटेल शेतकरी येथे ते जेवणा साठी गेले असताना ही घटना घडल्याचा दावा करण्यात आला आहे.

**नेमके काय आहे प्रकरण?**

फिर्यादी समाधान खिंडकर यांनीपोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की,ते हॉटेल शेतकरी येथे जेवण करत असताना धनंजय देशमुख तेथे आले. त्यानंतर त्यांच्यात काही कारणावरून वाद निर्माण झाला.या वादा दरम्यान धनंजय देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार,धनंजय देशमुख यांच्यासोबत असलेल्या पोलीस अंगरक्षकाकडे असलेली पिस्तूल त्यांनी घेतली आणि ती थेट फिर्यादी च्या डोक्याला लावून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.



**पोलिसांकडून गुन्हा दाखल**

या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १९२/२०२६ नोंद करण्यात आला आहे.पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील (इछड) विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

नोंदविण्यात आलेल्या कलमांमध्ये कलम १०९, ३५२,३५१(२) आणि ३(५) यांचा समावेश आहे.फिर्यादीच्या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून घटनेचे सर्व पैलू तपासले जात असल्याची माहिती सूत्रां कडून मिळाली आहे.

**जिल्ह्यात चर्चेला उधाण**

दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचे नाव यापूर्वीही विविध कारणांनी चर्चेत राहिले आहे.अशा परिस्थितीत त्यांच्या बंधू विरोधात गुन्हा दाखल झाल्याची बातमी समोर आल्या नंतर जिल्हाभरात या घटनेची चर्चा सुरू झाली आहे.विशेष म्हणजे, तक्रारीत पोलीस अंगरक्षकाच्या शस्त्राचा वापर झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आल्याने या प्रकरणाकडे अधिक गांभीर्याने पाहिले जात आहे.अंगरक्षका कडील शस्त्र संबंधित व्यक्तीच्या ताब्यात कसे गेले,तसेच घटनेच्या वेळी नेमकी परिस्थिती काय होती,याचा तपास पोलीस करत आहेत.

**तपासावर सर्वांचे लक्ष**

या प्रकरणातील आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असल्याने आता पोलिसांच्या तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींचे जबाब आणि इतर पुरावे तपासून सत्य परिस्थिती समोर आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

दरम्यान,या प्रकरणात अद्याप धनंजय देशमुख यांची अधिकृत भूमिका समोर आलेली नसून, पोलिसांकडून तपास पूर्ण झाल्यानंतरच संपूर्ण सत्य स्पष्ट होणार आहे.

**महत्त्वाची नोंद**

सदर वृत्त हे पोलिसांत दाखल करण्यात आलेल्या फिर्यादी आणि उपलब्ध प्राथमिक माहितीनुसार प्रकाशित करण्यात आले आहे. प्रकरणाचा तपास सुरू असून न्यायालयीन किंवा पोलीस तपासातून पुढे येणारी माहिती अंतिम मानली जाईल.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर म्हणजे कार्य कर्तृत्व,नेतृत्व आणि दातृत्वाचा त्रिवेणी संगम होय-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक ३१ मे २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती ग्रंथप्रदर्शन,परिसंवाद, व्याख्यान,वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून साजरी करण्यात आली.सकाळी ८ ते ४ या वेळात विविधसांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.

सर्वप्रथम सकाळी ८ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.



सकाळी ८ ते ४ या वेळेत अहिल्याबाई होळकर यांच्यावर लिहिलेल्या सर्व साहित्याचे ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले. त्यानंतर सकाळी ८ ते १० यावेळेत कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या. कथाकथन स्पर्धेत प्रथम आनंद गायकवाड,द्वितीय शिवानी भगत हे विजयी झाले.त्यानंतर १० ते ११ या वेळेत जेष्ठविचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांचे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कार्यकर्तृत्व, नेतृत्व व दातृत्व या विषयावर व्याख्यान झाले.११ ते १२ या वेळात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.वक्तृत्व सर्धेत प्रथम गौरी ज्ञानेश्वर गायकवाड, द्वितीय अजिंक्य श्रीकृष्ण तट विजयी झाले.१२ ते १ या वेळात परिसंवाद घेण्यात आला. परिसंवादात एस.के. वैरागे,रामराजे गायकवाड,रावसाहेब जाधव,दिगांबर गायकवाड यांनी सहभागी होवून मार्गदर्शन केले.वक्तृत्व स्पर्धा व कथाकथन स्पर्धेचे परिक्षक म्हणून बागसाहेब गायकवाड यांनी काम पाहिले. विजयी स्पर्धकांना प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड,बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.या विविध कार्यक्रमात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, दिगांबर गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, एस.के.वैरागे,गौरी गायकवाड,कृष्णराजे गायकवाड,स्वरूप पानढवळे,लक्ष्मी पुंड, अजिंक्य तट,शिवानी भगत यांच्यासह वाचक, हितचिंतक,युवक, विद्यार्थी,जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा सिमरी पारगाव येथे राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील सिमरी पारगाव येथे दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील नागरिक, युवक, तसेच विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमास गावचे सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना प्रकाश कोरडे सर यांनी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, अहिल्याबाई होळकर या जगातील उत्कृष्ट महिला प्रशासकांपैकीएक होत्या. त्यांच्या जीवनकार्याकडे पाहून संघर्ष, समाजसेवा, सामाजिक न्याय आणि लोककल्याणाची प्रेरणा मिळते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत जनतेच्या हितासाठी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. महिलांच्या सन्मानासाठी आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे त्या आजही आदर्श राज्यकर्त्या म्हणून स्मरणात आहेत. उपस्थित मान्यवरांनीही राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडले.;



# एकाच दिवशी तीन ठिकाणी गुटखा माफियांवर पोलिसांचा धडाका

## १० लाखांच्या मुद्देमालासह गुटखा जप्त; तरीही जिल्ह्यात गुटखा विक्री जोमात!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अवैध गुटखा व्यवसायाने अक्षरशः मुळे घट्ट रोवली असताना स्थानिक गुन्हे शाखेने शनिवारी (३१ मे) धडक कारवाई करत तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून तब्बल १० लाख ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले असले तरी जिल्ह्यातील अवैध गुटखा विक्रीचे जाळे किती मोठे आहे, यावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवत बीड शहर, बडगाव आणि सिरसाळा परिसरात कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून गुटखा विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांवर धाड टाकली.

पहिल्या कारवाईत बीड शहरातील बसस्थानकासमोर एका इसमाकडून २ लाख २१ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत बडगाव परिसरात एका स्विफ्ट कारमधून अवैध गुटख्याची वाहतूक होत असल्याचे उघड झाले. या कारवाईत गुटखा आणि वाहन असा ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तिसऱ्या कारवाईत सिरसाळा हद्दीतील पेंडर गावाजवळ एका ऑटो रिक्षामधून गुटखा विक्रीसाठी नेत असताना आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकला. येथून ३ लाख ३२ हजार ८०० रुपयांचा गुटखा व वाहन जप्त करण्यात आले.तीनही कारवायांमध्ये मिळून १० लाख ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



### कारवाई स्वागतार्ह; पण 'मोठे मासे' अजूनही मोकाट?

**स्थानिक गुन्हे शाखेने केलेली कारवाई कौतुकास्पद असली तरी जिल्ह्यातील गावोगावी, चौकाचौकात आणि पानटपऱ्यांवर खुलेआम गुटखा विक्री सुरू असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. दररोज लाखो रुपयांची उलाढाल करणाऱ्या गुटखा माफियांच्या मुख्य साखळीपर्यंत पोलिसांचे हात पोहोचणार का, हा खरा प्रश्न आहे.एक-दोन छाप्यांनी गुटखा व्यवसाय थांबणार नाही. पुरवठादार, गोदामे आणि मोठे वितरक यांच्यावर कठोर कारवाई झाल्यासच गुटखा माफियांचे कंबरडे मोडू शकते. जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा याबाबत किती गंभीर आहे, याकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे.**

# राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी बीड जिल्हाचे कुमार-मुली दोन्ही संघ रवाना

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची सन २०२६-२७ सालची ५२ वी कुमार - मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा महाराष्ट्र खो खो असोसिएशनच्या मान्यतेने किरण स्पोर्ट्स सोलापूर यांच्या विद्यमाने दि. ०२ ते ०५ जून, २०२६ या कालावधीत सोलापूर येथे आयोजित होणार आहे या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारे कुमार-मुली हे दोन्ही संघ सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेसाठी एमॅच्युअंर खो-खो असोसिएशनी कुमार संघांचे प्रशिक्षण शिबिर शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराई आणि मुलींचे राजर्षी शाहू कन्या विद्यालय बीड येथे घेऊन दोन्ही अंतिम संघ निवडला कुमार संघ (मुले) कर्णधार सुशांत तलवाडे,आयुष दिवाण सौरभ खरात,करण मोमीन,आर्यन घोलप,निशांत तलवाडे,कार्तिक सावंत,(न्यू हायस्कूल



गेवराई ) माऊली चोरमले( द.बा.घुमरे वि.गेवराई) आकाश उकांडे,हर्षद हंबर्डे, शंभुराज नलावडे,वैभव शेळके, सार्थक धस,(निवृत्तीराव धस वि.जा.आष्टी)सचिन भांडवले,हरिओम मांडवे(सैनिकी वि.बीड) प्रशिक्षक - नवनाथ चव्हाण व्यवस्थापक-भरत यादव मुलीचा संघ कर्णधार अक्षरा चोले, थापडे संपदा, थापडे भक्ती, बोरगे नंदिनी, येवले कीर्ती, शिवनगे सानिका, शेलकर अक्षरा, (राजर्षी शाहू कन्या वि. बीड) श्रद्धा करे, ममता अंधारे (न्यू हायस्कूल गेवराई) प्रतीक्षा येवले ( र. भ अट्टल कॉलेज गेवराई) यज्ञा काळे (शिवाजी वि. बीड) कोल्हे सोनाली (सिंदफणा वि.शिरूर) समृद्धी घोलप (सेंट झेविस गेवराई) नाईक नवरे दुर्गा (माजलगाव) प्रशिक्षक -तुकाराम करंडे व्यवस्थापिका-रोहिणी देवगूडे या दोन्ही संघांना शुभेच्छा देण्यासाठी मा.पृथ्वीराजे पंडित, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा.जे.पी शेळके मा. रमेश भाऊ शिंदे, राज्य प्रसिद्धी समितीचे सदस्य प्रा.राजेंद्र बरकसे, बापुसाहेब तारूकर, एमॅच्युअंर खो-खो असोसिएशनचे सचिव विजय जाहेर, रविंद्र खरात, रमेश पिसाळ, महेश वायभसे या सर्वांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# खरीप तोंडावर : कर्जमाफी अन् नव्या पीककर्जाची प्रतीक्षा, बळीराजा चिंतेत

## पेरणीसाठी पीककर्ज न मिळाल्यास शेतकऱ्याला अडचण होणार

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी संथ गतीने सुरू असल्याने किनवट आदिवासी तालुक्यातील अनेक परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. खरीप हंगाम अगदी काही दिवसांवर आला असताना कर्जमाफी प्रक्रिया व नवीन पीक कर्ज वितरणाबाबत शेतकरी अनिश्चिततेत आहेत.

राज्य सरकारने थकीत पीककर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, तसेच नियमित पीककर्जधारकांना ५० हजार रुपये

खरीप तोंडावर; कर्जमाफी आणि नव्या पीक कर्जाची प्रतीक्षा, शेतकरी चिंतेत

प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा केली होती. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात यासाठी तरतूदही करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी वेगाने न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.


खरीप हंगाम जवळ येत असताना बाजारात रासायनिक खतांचे दर वाढले असून, बियाणे व इतर शेतीनिविष्ठांसाठीभांडवल उभे करणे कठीण झाले आहे. जुन्या कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळण्यात अडचणी येत असल्याचेही चित्र आहे. कर्जमाफीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी अनेक परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.पेरणीसाठी वेळेवर पीककर्ज मिळाले नाही तर शेतकऱ्यांची मोठी अडचण होईल. कर्जमाफीची प्रक्रिया लवकर पूर्ण करून पीककर्ज वाटप सुरू करावे, अशी प्रतिक्रिया शेतकरी अडकिने पाटील, पाटोदा चे उपसरपंच आकाश पाटील व चिखलीच्या शेतकऱ्यांनी दिली आहे.

# पुरुषोत्तम पुरी यात्रेत होमगार्ड जवानांची शौर्यगाथा; बुडणाऱ्या भाविकाचे प्राण वाचवले

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी येथे अधिक मास यात्रेनिमित्त हजारो भाविकांची गर्दी उसळली असताना एक मोठी दुर्घटना टळली. नदीपात्रात स्नानासाठी उतरलेल्या एका भाविकाला पाण्याचा अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात जाऊन बुडू लागला. काही क्षणांतच परिस्थिती गंभीर बनली होती. मात्र, बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या होमगार्ड जवानांनी दाखवलेल्या धाडस, तत्परता आणि कर्तव्यदक्षतेमुळे संबंधित भाविकाचे प्राण वाचले.

यात्रास्थळी सुरक्षा व्यवस्था सांभाळत असलेले होमगार्ड जवान राजू पंडित, सुरेश बारस्कर आणि मुजाहिद शेख यांनी नदीपात्रात सुरू असलेली धावपळ आणि मदतीसाठी होणारा आक्रोश तात्काळ ओळखला. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेतले आणि घटनास्थळी उपलब्ध असलेली बोट घेऊन नदीच्या मध्यभागी धाव घेतली. जीवाची पर्वा न



करता त्यांनी बुडणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचून त्याला सुरक्षितरीत्या बाहेर काढले.

या धाडसी बचावकारवाईमुळे उपस्थित भाविकांनी सुटकेचा निश्वास सोडला. काही मिनिटांचा विलंब झाला असता तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता आली नसती. होमगार्ड जवानांच्या प्रसंगावधानामुळे एक कुटुंब उद्धस्त होण्यापासून वाचले असून त्यांच्या या शौर्यपूर्ण कृतीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सदर बंदोबस्ताची व्यवस्था मा. राहुल कुमार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली होती. यात्रेदरम्यान भाविकांच्या सुरक्षिततेसाठी विविध ठिकाणी दक्ष कर्मचारी तैनात करण्यात आले होते. या घटनेनंतर होमगार्ड जवानांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मा. तालुका समादेशक अधिकारी एम. एम. पांचाळ साहेब यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी जवानांच्या तत्परतेचे आणि कर्तव्यनिष्ठेचे कौतुक करत अशा कार्यामुळे होमगार्ड दलाची प्रतिष्ठा अधिक उंचावल्याचे सांगितले.

दरम्यान, पुरुषोत्तम पुरी परिसरातील ग्रामस्थ, यात्रेकरू आणि स्थानिक नागरिकांनीही या तिन्ही जवानांच्या धाडसाला सलाम करत त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. संकटसमयी दाखवलेले धैर्य, प्रसंगावधान आणि मानवतेची जपलेली भावना यामुळे राजू पंडित, सुरेश बारस्कर आणि मुजाहिद शेख हे यात्रेतील खरे हिरो ठरले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे होमगार्ड दलाविषयी समाजात आदर आणि विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# धम्मसंस्कार शिबीर : आचरणात बौद्ध धम्म आणण्यासाठी विद्यार्थ्यांचे 'संस्कारकेंद्र'

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांपुढे संधी जितक्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, तितकीच आव्हानेही वाढलेली आहेत. शिक्षण, करिअर आणि यशाच्या शर्यतीत धावताना अनेक विद्यार्थी मानसिक तणाव, नैराश्य, अस्थिरता, आत्मविश्वासाचा अभाव, मोबाईल व सोशल मीडियाचे व्यसन आणि दिशाहीनतेच्या समस्यांना सामोरे जात आहेत. ज्ञान आणि माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध असूनही जीवनमूल्ये, नैतिकता, सामाजिक जाणीव, करुणा आणि मानवतावादी दृष्टिकोन यांची कमतरता जाणवू लागली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आणि त्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी धम्मसंस्कार शिबिरांची आवश्यकता आज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे.याच उद्देशाने यशोधरा बुद्धविहार समिती, माजलगाव यांच्या वतीने विशेष धम्मसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दि. २ जून ते १२ जून २०२६ या कालावधीत यशोधरा बुद्धविहार, माजलगाव येथे संपन्न होणार आहे. या शिबिरात विद्यार्थ्यांना पूज्य भिक्खू धम्मशील थेरो (प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, शिवणी, जि. बीड) तसेच भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांचे बहुमूल्य मार्गदर्शन, धम्मदेसना आणि प्रेरणादायी संस्कार लाभणार आहेत. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिसरातील बौद्ध धम्म अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते आणि धम्मप्रेमी यांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभत आहे.माजलगाव शहर व परिसरातील १० ते २० वर्षे वयोगटातील विद्यार्थी आणि युवक-युवतींसाठी हे शिबीर एक सुवर्णसंधी ठरणार आहे. बालपण आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेला हा काळ व्यक्तिमत्त्व घडविण्याचा, जीवनमूल्ये रुजविण्याचा आणि भविष्याची दिशा निश्चित करण्याचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या वयात योग्य संस्कार, सकारात्मक विचार आणि नैतिक मूल्यांची जपणूक झाली तर जीवनाची वाटचाल अधिक सुकर, यशस्वी आणि अर्थपूर्ण बनते. त्यामुळे प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याला या शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे ही काळाची गरज आहे.बुद्धांचा धम्म हा केवळ धर्म नसून जीवन जगण्याची एक विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी पद्धती आहे. तो अंधश्रद्धा, कर्मकांड आणि भेदभावापासून मुक्त करून माणसाला विचारस्वातंत्र्य, आत्मपरीक्षण आणि प्रज्ञेचा मार्ग दाखवितो. बौद्ध बनणे म्हणजे बदलणे होय या विचाराप्रमाणे धम्मसंस्कार शिबिर विद्यार्थ्यांच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनदृष्टीत सकारात्मक परिवर्तन घडविण्याचे कार्य करते. या शिबिरामध्ये त्रिशरण, पंचशील, ध्यानसाधना, नैतिक मूल्ये, धम्मविचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्व यांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला जातो.ध्यानसाधना आणि धम्मचिंतनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनाची एकाग्रता वाढते, चित्त स्थिर होते आणि आत्मविश्वास दृढ होतो. राग, द्वेष, मत्सर, भीती आणि न्यूनगंड यांसारख्या नकारात्मक भावनांवर नियंत्रण मिळविण्याची क्षमता विकसित होते. त्याऐवजी मैत्री, करुणा, प्रज्ञा, समता, बंधुता आणि सहिष्णुता यांसारखी मानवी मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजतात. परिणामी विद्यार्थी केवळ परीक्षेत यश मिळवणारा नव्हे, तर चारित्र्यसंपन्न, संवेदनशील, विवेकी आणि समाजाभिमुख नागरिक म्हणून घडतो.आजच्या काळात अनेक पालक आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करतात; मात्र जीवनमूल्यांचे शिक्षण आणि नैतिक संस्कार यांचे महत्त्व तितकेच अनन्यसाधारण आहे. धम्मसंस्कार शिबिर हे विद्यार्थ्यांच्या मनाला आणि विचारांना योग्य दिशा देणारे एक प्रभावी संस्कारकेंद्र आहे. येथे मिळणारे शिक्षण पुस्तकांच्या पलीकडे जाऊन जीवन समृद्ध करणारे असते.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारताना मानवाच्या मनाचा सर्वोच्च विकास हेच धम्माचे अंतिम ध्येय असल्याचे अधोरेखित केले होते. धम्मसंस्कार शिबिरे हे त्या ध्येयाकडे वाटचाल करणारे प्रभावी माध्यम आहे. या शिबिरांतून निर्माण होणारी नवी पिढी केवळ सुशिक्षित नव्हे तर सुसंस्कृत, विवेकी, जबाबदार आणि मानवतावादी नागरिक म्हणून घडू शकते. समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांची रुजवात करण्यासाठी अशा संस्कारांची आज नितांत आवश्यकता आहे.म्हणूनच माजलगाव व परिसरातील प्रत्येक १० ते २० वर्षे वयोगटातील विद्यार्थी आणि युवक-युवतींनी या धम्मसंस्कार शिबिरात सहभागी होऊन या अनमोल संधीचा लाभ घ्यावा. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा विधायक उपयोग करून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा, जीवनाला नवी दिशा द्यावी आणि बुद्धांच्या धम्मातील प्रज्ञा, करुणा व समतेच्या मूल्यांचा स्वीकार करावा. बुद्ध, धम्म आणि संघ यांच्या मार्गदर्शनाखाली घडणारे हे संस्कारच खऱ्या अर्थाने जीवनाला प्रकाशमान करणारे आणि आचरणात बौद्ध धम्म आणण्यासाठी दिव्य दृष्टी देणारे ठरतील.धम्माचा स्वीकार म्हणजे केवळ धर्मांतर नव्हे, तर मन, विचार आणि आचरणाचे परिवर्तन होय.



धम्ममित्र दीपककुमार भालेराव.
विवेकानंदनगर माजलगाव.

# शेती पिकांसाठी शेतकऱ्यांनी माती परिक्षण नुसार जैविक खताचा वापर करावा

दैनिक वादळ वार्ता
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी खरीप हंगामात माती परीक्षण नुसार खताचा संतुलित वापर, जैविक खतांचा वापर करावा तसेच सोयाबीन बियाण्याची योग्य वाणाची निवड करावी जेणेकरून पेरणी केल्यानंतर सर्व बियांची उगवण झाली पाहिजे सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी करून पेरणीस वापरावे असे आवाहन कृषि विभागामार्फत खरीप हंगाम पूर्व तयारी संदर्भात बैठक घेऊन कृषी सहायक सौ.एस आर. बेहेरे - ढगे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे.हिमायतनगर तालुक्यातील कारला येथे गुरुवारी सकाळी कृषि विभागामार्फत खरीप हंगाम पूर्व तयारी संदर्भात शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली या बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांना खरीप हंगाम पुर्व तयारी संदर्भात योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे.

कृषी सहायक सौ.एस आर. बेहेरे यांनी शेतकऱ्यांना या बाबत प्रत्येक्षिक करून दाखविले व माहिती दिली.बिजप्रक्रिया महत्व, इइक्र पद्धती ने पेरणी करणे, टोकन पद्धत वापरून बियाण्याची बचत करणे, दशपर्णी अर्क, जीवमृत, निबोळी अर्क बनविणे व कृषि निविष्ठा वरील खर्च कमी करणे, हुमणी कीड एकात्मिक वेवस्थापन करण्यासाठी लाईट ट्रॅप शेतात लावणे या विषयी माहिती दिली तसेच फळबाग लागवड तंत्रज्ञान, टंचाई परिस्थितीत फळबाग वाचवीने पीक स्पर्धा सहभाग घेणे आत्मा अंतर्गत गट करणे व कृषि विभागाच्या विविध वलीं वरील ऑनलाईन योजनाची माहिती देण्यात आली. या खरीप हंगाम पुर्व तयारी बैठकीत शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.या बैठकीत पोलिस पाटील साईनाथ कोथळकर, शेतकरी रामराव पाटील कदम,अविनाश पाटील, शिवाजी एटलेवाड,तुळशिराम वाठोरे, गजानन मिराशे,भिमराव लुम्दे, सोपान बोंपीलवार,राजेश ढाणके, दत्ता ढवळे,आनंद सुर्यवंशी,सुधाकर चव्हाण, कोंडबा कदम,बालाजी मोरे, तुकाराम कदम, लक्ष्मण ढाणके,अंगद सुरोशे,अशोक आचमवाड,सौ. आशा गोखले, भिमराव कांबळे,पुजांराम यमजलवाड यांच्यासह शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विषारी दारू प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा द्या; मृत कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी शासनास्तरावर पाठपुरावा करणार-आ.डॉ.नीलम गोऱ्हे

दैनिक वादळ वार्ता

**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

फुगेवाडी व हडपसर परिसरात घडलेल्या विषारी दारू प्रकरणामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून, या घटनेला जबाबदार असलेल्या नराधमांना कठोरातील कठोर शिक्षा देऊन फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार, डॉ. गोऱ्हे यांनी रविवारी फुगेवाडी परिसरात जाऊन अनेक मृतांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. तसेच शिवसेनेच्या वतीने पीडित कुटुंबांना रोख तातडीची आर्थिक मदत सुपूर्द केली. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, इरफानभाई सय्यद, महिला जिल्हा प्रमुख मनिषा परांडे , निलेश हाके, संजय काटे, मनीषा करंडे, अविनाश जाधव, ब्रिजेश नागदेवते, बाबू बापूर, श्रीकांत शेवाळे, करण काळे, सचिन खलसे, शैलेश हाके, गणेश आयाळी, यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**१३ कुटुंबांना शिवसेनेचा आधार**

या दौऱ्यादरम्यान फुगेवाडी येथील अक्षय अशोक अवसरमल, विजय प्रकाश राठोड, राजेंद्र प्रकाश राठोड, आनंद काशिनाथ निकाळजे, आनंद पांडेराव देसाई, अकबर अझीमखान पठाण, राजेश शांताराम राजपूत, सचिन रामचंद्र नेटके आणि बाबा सैय्यद हुसेन शेख यांच्या शोकाकुल कुटुंबांना भेटून मदत देण्यात आली. हडपसरयेथील चार परिवीरांना ३०मे रोजी आ.नीलम गोर्हे यांनी मदत केली आहे. ऊर्वरित हडपसर येथील व फुगेवाडीतील उर्वरित पीडित कुटुंबांनाही लवकरच ऑनलाईन पद्धमदत दिली जाईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. आतापर्यंत दोन्ही भागांतील जवळपास १३ कुटुंबांना मदत करण्यात आली आहे.

**केस स्टडी: कर्ते पुरुष गेले, मागे उरला फक्त निराशेचा अंधार!**

डॉ.नीलम गोऱ्हे यांनी फुगेवाडीतील पीडित कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेतली असता, या दुर्घटनेची अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक बाजू समोर आली आहे: अल्पशिक्षित महिला आणि रोजगाराचा प्रश्न: या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले बहुतेक सर्वजण कुटुंबातील एकमेव कमावते (कर्ते) पुरुष होते. अनेक घरांमध्ये आता केवळ महिला, लहान मुले आणि वृद्ध सदस्यच उरले आहेत. महिलांचे शिक्षण कमी असल्याने त्यांना तात्काळ रोजगार मिळणे कठीण झाले असून, उद्यापासून घर कसे चालवायचे, हा यक्षप्रश्न त्यांच्यासमोर आहे.

**मुलांचे शिक्षण धोक्यात:** वडिलांचे छत्र हरपल्यामुळे लहान मुलांच्या शालेय शिक्षणावर, आरोग्यावर आणि दैनंदिन उदरनिर्वाहावर मोठे संकट कोसळले आहे.

**वृद्ध आणि दिव्यांगांचे हाल:** काही कुटुंबांमध्ये वृद्ध आई-वडील किंवा दिव्यांग सदस्य आहेत, ज्यांना सांभाळणारे आता कोणीही राहिलेले नाही.

**निष्कर्ष:** यावरून स्पष्ट होते की, केवळ एकवेळची आर्थिक मदत देऊन या कुटुंबांचे प्रश्न सुटणारे नाहीत.'दीर्घकालीन पुनर्वसन पॅकेज' आणि प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला शाश्वत रोजगार मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

**केवळ हातभट्टी नव्हे, विषारी पुरवठा साखळीचा तपास व्हावा**

माध्यमांशी बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, महाराष्ट्रात अशा घटना घडल्यानंतर प्रत्येक वेळी विधिमंडळात चर्चा होते. मात्र, अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा हवी. हा केवळ एका हातभट्टीचा प्रश्न नसून मिथेनॉलसारख्या घातक रसायनांचा पुरवठा कुठून झाला, याची संपूर्ण 'सप्लाय चेन' शोधणे आवश्यक आहे. रासायनिक तपासणी अहवाल तातडीने समोर यायला हवेत आणि सक्षम सरकारी वकील नियुक्त करून खटला जलदगती न्यायालयात चालवला पाहिजे.

तक्रारी होऊनही कारवाईत ढिलाई का? पोलिसांवर प्रश्नचिन्ह!

पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर तीव्र नाराजी व्यक्त करत डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, स्थानिक शिवसैनिकांनी यापूर्वी लेखी निवेदने दिली होती. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या (DPDC) बैठकीतही हा विषय लावून धरला होता. तरीही पोलिसांचा धाक का निर्माण झाला नाही? छापे टाकल्यानंतरही या हातभट्ट्या पुन्हा सुरू कशा होतात, याची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. केवळ खालच्या अधिकाऱ्यांचे निलंबन करून भागणार नाही, तर यामागील आर्थिक हितसंबंध शोधून दोषींवर कडक कारवाई व्हावी.

**शासकीय मदतीसोबतच शाश्वत पुनर्वसनासाठी पाठपुरावा**

राज्य शासनाने मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपये आणि महानगरपालिकेने १ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. यासाठी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या मदतीचे स्वागत करतानाच डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, हातवर पोट असणाऱ्या या कुटुंबांना तात्पुरती मदत मिळेल, पण पुढच्या जगण्याच्या लढाईसाठी ठोस व्यवस्थेची गरज आहे. शिवसेनेच्या माध्यमातून आम्ही या महिलांना रोजगार आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत.

**शिवसेना शेवटपर्यंत पाठीशी राहणार!**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना या संपूर्ण परिस्थितीची कल्पना दिली आहे. शिवसेना या पीडित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. आगामी विधिमंडळ आणि संसदेच्या अधिवेशनातही या प्रकरणाचा आवाज उठवून दोषींना फाशीची शिक्षा मिळेपर्यंत आणि पीडितांना पूर्ण न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, अशी ग्वाही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी दिली.

# वरुणराजाच्या ऋणात कुंडलला बारामेघ यात्रा

## पाटला देव,राणी काजल एवं देवमोगरा माता संस्थानचा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

ऋतू चक्रातील बाराही महिने पुरेल एवढ्या जीवनावश्यक बाबींची पूर्तता करुन देणाऱ्या वरुणराज (मेघराज) यांच्या प्रति ऋण व्यक्त करण्यासाठी पाटला देव, राणी काजल एवं देवमोगरा माता संस्थानतर्फे कुंडल ता.धडगाव येथे दि.७ जून रोजी बारामेघ यात्रा भरविण्यात येणार आहे. निसर्गाच्या ऋतुचक्रात नियमितता ठेवण्यास महत्वाचा घटक असलेल्या पावसाळ्याचे दिवस सुरु झाले आहे. पावसाळा हा प्रत्येक जीवजंतू व प्रकृतीला आवश्यक असलेल्या बाबींची वर्षभरासाठी तरतूद करुन देत असतो. म्हणून कुंडल ता.धडगाव येथील पाटला देव, राणी



काजल एवं देवमोगरा माता संस्थानतर्फे वर्षानुवर्षे बारामेघ यात्रा भरविण्यात येते. ही यात्रा यंदाही भरविण्यासाठी ट्रस्ट काही दिवसांपासून दर्शन व पूजाविधीच्या कामात सक्रिय झाली आहे. यात्रेपूर्वीच महाराष्ट्रासह मध्यप्रदेश व गुजरातमधून भाविक मातेच्या दर्शनासाठी दाखल होत आहे. यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांना कुठल्याही अडचणी येऊ नये व त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ट्रस्टने समित्या गठीत केल्या असून त्या माध्यमातून नियोजन सुरू आहे. त्यात ट्रस्टचे अध्यक्ष बाजूबाई ईला पाडवी, सचिव अनिता अमृत पटले, उपाध्यक्ष ईला पाडवी, मांगीलाल पाडवी, राकेश वळवी, दारासिंग पाडवी, देवेंद्र पाडवी, महेंद्र पाडवी, कोहट्या पाडवी हे अहोरात्र परिश्रम घेत आहे.

**प्रबोधनात्मक उपक्रम**

वर्षभरात येणारे सर्व सण – उत्सव साजरा करणाऱ्या पाटला देव, राणी काजल एवं देवमोगरा माता संस्थानतर्फे परंपरेनुसार सामाजिक प्रबोधनासाठी सोंगाड्या कलापथकाचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून भाविकांना बारामेघ पूजनाचे महत्व पटवून दिले जाणार आहे. शिवाय नर्मदा परिक्रमेतील भक्तांना नियमित अन्नदान ही या ट्रस्टच्या वतीने करण्यात येते. त्यानुसार यात्रेदरम्यान महाअन्नदान देखील करण्यात येणार आहे.

# रांजणी येथे अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील ग्रामपंचायत कार्यालयात शनिवारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी रांजणी ग्रामपंचायत कार्यालयात अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच अमोलभाऊ देशमुख, उपसरपंच शेख रहीम, ग्रामपंचायत सदस्य कैलास वरखडे, दगडू भालेकर, रमण जाधव, मधुकर देशमुख, विजयकुमार खुळे, धनंजय देशमुख, बंडू गाढे, राहुल देशमुख, अशोक देशमुख, भारत सोलाट, अशोक गाढे, बबन सोलाट, दत्ता इंगळे यांच्यासह कार्यकर्ते व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या शेकडो पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षातील अनेक पदाधिकाऱ्यांनी शनिवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते विजय चौधरी, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, माध्यम विभाग प्रमुख गोविंद येतयेकर आदी उपस्थित होते. श्री. तनपुरे हे २०१९ मध्ये राहुरी मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले होते. महाविकास आघाडी सरकारमध्ये श्री. तनपुरे राज्यमंत्री होते.



यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण म्हणाले, राहुरी मतदारसंघातील नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीच्या वेळी मी माझ्या सहकाऱ्यांसोबत प्राजक्त तनपुरे यांच्यासोबत चर्चा केली तेव्हा त्या विधानसभा मतदार संघातील तिन्ही तालूक्यातील अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लागण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची तयारी त्यांनी दर्शवली. त्यांना जनतेच्या प्रश्नांची उत्तम जाण आहे. वर्षानुवर्षे समाजातील अनेक घटकांसोबत त्यांनी काम केले आहे. ज्या विश्वासाने श्री. तनपुरे यांनी भाजपात प्रवेश केला आहे त्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. भाजपा संघटना त्यांच्या पाठीशी उभी राहील, अशी ग्वाहीही श्री. चव्हाण यांनी दिली .

यावेळी प्राजक्त तनपुरे म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून या मतदारसंघातील वीज, शेती आणि पाण्याच्या प्रश्नाची सोडवणूक होईल. पक्ष भविष्यात जी काही जबाबदारी सोपवेल ती उत्तमप्रकारे पार पाडेन.

यावेळी राहुरी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे राहुरी तालुकाध्यक्ष मच्छिंद्र सोनवणे, अहिल्यानगर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष बाबासाहेब भिटे, राहुरी उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, युवक तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर वाचकर, राहुरी तालुका युवक शहर अध्यक्ष संतोष आघाव, पाथर्डी उपाध्यक्ष जालिंदर वामन, अंबादास डमाळे, राहुरी पंचायत समिती माजी उपसभापती बाळासाहेब लटके, राहुरी पंचायत समिती माजी उपसभापती रवींद्र आढाव, किसनराव जवरे, प्रभाकर गाडे, नंदराज पाटील, अजय जाधव, गोरखनाथ पवार, महेश पानसरे, महेश उदावंत, ओंकार कासार, चंद्रकांत पानसंबळ, सोहम प्राजक्त तनपुरे, अनेक नगरसेवक आणि असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला.


# शेळगाव मध्ये भक्तीचा महापूर आशिषानंद भारती महाराजांच्या उपस्थितीत नृसिंह स्वामींचा भव्य विशेष महापूजा सोहळा

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

भक्ती, शक्ती आणि अखंड लोकसेवेचा त्रिवेणी संगम आज मौजे शेळगाव येथे पाहायला मिळाला आहे. वाण गंगा मठाचे परमपूज्य मठाधिपती श्रद्धेय ष.ब्र.श्री आशिषानंद भारती महाराज (धारूर) यांचे आज शेळगावात शुभआगमन झाले. महाराजांनी श्री स्वयंभू नृसिंह स्वामींच्या चरणी नतमस्तक होऊन मनोभावे महापूजा केली. यावेळी अखंड शेळगाव नगरी नृसिंह स्वामींच्या जयघोषाने आणि महाराजांच्या दर्शनाने भक्तीरसात न्हाऊन निघाली होती. दोन वर्षांपूर्वी श्रद्धेय आशिषानंद भारती महाराजांच्या दिव्य प्रेरणेतून आणि मार्गदर्शनातून शेळगावच्या भूमीत 'दर पौर्णिमेला महाप्रसाद' या पवित्र उपक्रमाची सुरुवात झाली होती. पाहता पाहता या सेवेला तब्बल दोन वर्षे पूर्ण झाली असून, एकही पौर्णिमा न चुकता हा अन्नदानाचा यज्ञ अविरतपणे सुरू आहे. गावकऱ्यांची ही अथांग भक्ती पाहून आज महाराजांनीही शेळगावकरांचे विशेष कौतुक केले.

या महाप्रसाद उपक्रमाची ख्याती आता पंचक्रोशीत पसरली आहे. नृसिंह स्वामींच्या चरणी अन्नदानाची सेवा अर्पण करण्यासाठी भाविकांमध्ये अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, आगामी पौर्णिमांच्या महाप्रसादाचे यजमानपद (कार्ये) मिळवण्यासाठी अनेक दानशूर भाविक सध्या 'वेटिंग'वर आहेत. ही 'वेटिंग लिस्ट'च शेळगावकरांच्या श्रद्धेची खरी पावती आहे. आज मठाधिपती आशिषानंद महाराजांच्या दर्शनासाठी आणि महापूजेचा सोहळा डोळ्यात साठवण्यासाठी संपूर्ण गावातील अबालवृद्ध, महिला आणि तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. मंदिराच्या परिसरात झालेली गर्दी आणि गावकऱ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. या उपक्रमामुळे मौजे शेळगाव हे धार्मिक सलोखा आणि सामाजिक एकतेचे एक आदर्श केंद्र बनले आहे.



# साबला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभाग, मुंबई यांच्या आदेशा नुसार ग्रामपंचायत कार्यालय,साबला येथे सरपंच जनाबाई नरहरी काकडे,ग्रामपंचायत सदस्या आश्रुबाई श्रीमंत काकडे,पार्वती महादेव नाईकनवरे यांच्या हस्ते प्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुढील कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त गावातील ज्या महिला सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक, धार्मिक,आरोग्य विषयक समाजकार्यात उत्कृष्ट काम करत असलेल्या महिलांना ग्रामपंचायत कार्यालय,साबला.सरपंच जनाबाई नरहरी काकडे, ग्रामपंचायत सदस्या आश्रुबाई श्रीमंत काकडे, पार्वती महादेव नाईकनवरे यांच्या शुभ हस्ते सुनिता अशोक काकडे,अनिता रामराजे शिंदे,छायाबाई बारिक राव काकडे,मंगल बालाजी काकडे, आशाबाई अंकुश मुळे, राधा रामकाकडे,सारिका विजय नाईकनवरे,सुरेखा विष्णू कटारे,सुरेखा श्रीराम राऊत,आम्रपाली सुधीर सरवदे,मिरा



संभाजी घाडगे,आरती अनिल सरवदे वरील इत्यादी महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच यावेळी आंगणवाडी मदतनिस वैशाली विजय सरवदे,केशरबाई अभिमान सरवदे,ऋतुजा ईश्वर नाईकनवरे,ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोलिस पाटील अविनाश गुलाब काकडे, समाजसेवक नरहरी काकडे,रामराजे शिंदे, गणेश कटारे,अशोक काकडे,बारिकराव काकडे,योगिराज मुळे, आश्रुबा नाईकनवरे, हनुमंत मुळे,माऊली नाईकनवरे,रामराजे काकडे,बाबासाहेब काकडे,शाम काकडे, फोटोग्राफर राहुल मुळे, नितिन काकडे तसेच या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077